नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा
प्रशासकीय सभा
ठराव क्रं.1 दि.30/3/2022

1. **सन 2019-20 लेखा परीक्षण प्राप्त अहवालावर विचार विनिमेय करुन निर्णय घेणे.**

मलकापूर नगर परिषदेचे सन 2019-20 या आर्थीक वर्षाचे लेखापरीक्षण सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय,बुलढाणा यांचे कडून झाले असून लेखा परीक्षण अहवाल आवक क्रं.1726 दि.27/12/2021नुसार प्राप्त झाला आहे.

सदर लेखा परीक्षण अहवालात 9अ,9ब,9क,तसेच 9ड या अंतर्गत लेखा आक्षेप नोंदविले आहेत लेखा परीक्षण अहवालात नोंदविले नुसार आक्षेपाधीन रक्कम 10,05,327 वसुलपात्र रक्कम 5,14,114/- अंतिम अमान्य रक्कम रु6,068/- व गुंतलेली रक्कम रु.4,54,07,539 असे वर्गीकरण नोंदविली आहे. तसेच अहवालात एकूण 46 लेखा आक्षेप नोंदविले आहे असा अहवाल लेखा परीक्षक,नगर परिषद,मलकापूर तसेच मुख्याधिकारी यांनी सादर केला आहे. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की लेखा परीक्षण अहवाल सन 2019-20 यास ही सभा मान्यता देत आहे.लेखा परीक्षण अहवाल वर्गीकरण 9अ,9ब,9क,9ड नुसार 46 लेखा आक्षेपांचा निपटारा करण्यासाठी वसुलपात्र रक्कम 5,14,114/- अंतिम अमान्य रक्कम रु.6,068/-आक्षेपाधीन रक्कम रु.10,05,327/- गुंतलेली रक्कम रु.4,54,07,539 वर्गीकरणानुसार लवकरात लवकर आक्षेपाचा निपटारा करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख यांना लेखा आक्षेपाची प्रत देवून आवश्यक वसुली रक्कम वसुल करुन अनुपालन अहवाल स्थानिक निधी,बुलढाणा यांना सादर करावा.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

(आर.यु.सुरडकर)
प्रशासक,
नगर परिषद,मलकापूर

Scanned by Scanner Go